आषाढी वारी-२०२६ मध्ये मदत व पुनर्वसन विभागाच्या विविध कल्याणकारी योजनांचा प्रचार व प्रसिध्दी आराखड्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता

महाराष्ट्र शासन
मदत व पुनर्वसन विभाग
शासन निर्णय क्रमांकः सीएलएस-२०२६/प्र.क्र. २८५/मदत-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
दिनांक: २२ जुलै, २०२६.

<u>वाचा</u> :-

१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. मावज-२०२१/प्र.क्र.१२६/का-३४, दि.१३ ऑगस्ट, २०२१.

२) माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या माध्यम आराखडा नियोजन व अंमलबजावणी समिती बैठक इतिवृत्त व निर्णय

<u>प्रस्तावना :-</u>

नैसर्गिक आपत्तीमुळे बाधितांसाठी मदत तसेच, पुनर्वसित गावांमधील नागरिकांसाठी सोयी सुविधांबाबत अनेक महत्त्वपूर्ण निर्णय शासनामार्फत घेण्यात आले आहेत. संकटाच्या काळात राज्य शासनाने दिलेली तत्पर मदत, पुनर्वसनाची प्रभावी अंमलबजावणी तसेच जनहिताचे निर्णय यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. राज्यातील आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना विविध योजनांची मदत थेट लाभार्थ्यांच्या खात्यात (DBT द्वारे) जमा करण्यात आली आहे. याशिवाय पुरामुळे बाधित विहिरींसाठी मदत/अर्थसहाय्य, पशुहानी नुकसान, पुरामुळे खरडून गेलेल्या शेतीच्या पुनर्बाधणीसाठी सहाय्य तसेच प्रकल्प ग्रस्तांचे पुनर्वसन याबाबत निर्णय घेण्यात आले आहेत.

आषाढीवारी महाराष्ट्रातील सर्वात मोठी लोकसंपर्काची आणि जनसंवादाची परंपरा आहे. लाखो वारकरी, शेतकरी, महिला, युवक आणि ग्रामीण भागातील नागरिक या काळात एकत्र येऊन वारीमध्ये पालखीबरोबर प्रवास करत असतात. या पार्श्वभूमीवर विभागाच्या विविध योजना, मदतकार्य, पुनर्वसन उपक्रम, आपत्तीपूर्वतयारी आणि शासनाच्या जनहितकारी निर्णयांची माहिती व्यापक प्रमाणावर पोहोचविण्यासाठी "संवाद वारी- २०२६ जनसंवाद अभियान" हा विशेष उपक्रम १) आळंदी ते पंढरपूर - संत ज्ञानेश्वर महाराज व २) देहू ते पंढरपूर जगद्गुरू संत तुकाराम महाराज या दोन्ही पालखी मार्गावर विविध माध्यमातून योजनांची प्रसिध्दी करण्याकरीता माध्यम आराखड्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

प्रसिध्दीच्या माध्यमातून लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहचविण्याकरीता माहिती व जनसंपर्क महासंचालनालय माध्यम आराखडा नियोजन व अंमलबजावणी समिती दि.२५ जून, २०२६ रोजी पार पडलेल्या बैठकीमध्ये रु.१,९९,७७,५००/-(रूपये एक कोटी नव्याणव लाख सत्त्याहत्तर हजार पाचशे रुपये फक्त) सर्व करांसहीत इतक्या खर्चाच्या प्रचार व प्रसिध्दीच्या माध्यम आराखड्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार रु.१,९९,७७,५००/-(रूपये एक कोटी नव्याणव लाख सत्त्याहत्तर हजार पाचशे रुपये फक्त) इतक्या रकमेच्या माध्यम आराखड्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. सदर माध्यम आराखड्याचा तपशील खालीलप्रमाणे:-

अ.क्र.	प्रचार व प्रसिध्दी माध्यम तपशील	कालावधी	एकूण अंदाजित रक्कम (रुपये)	जीएसटी (रुपये)	एकूण अंदाजित रक्कम (सर्व करासहीत) (रुपये)
१) आळंदी ते पंढरपूर - संत ज्ञानेश्वर महाराज पालखी	चित्ररथ एलइडी स्क्रीनसह योजनांची प्रसिद्धी करणे (चित्ररथ LED स्क्रीनसह जनजागृती वाहन, माहितीपत्रके, माहितीपट, कलापथक, जनसंवाद कार्यक्रम, क्रिएटिव्ह निर्मिती, फेब्रिकेशन डिझाईन, सजावट लेआऊट, जनरेटर, स्पीकर ,माईक व ऑडिओ-व्हिज्युअल सिस्टीमसह इत्यादी)	आषाढी वारी २०२६ संपूर्ण कालावधी			
२) देहू ते पंढरपूर जगद्गुरू संत तुकाराम महाराज पालखी	चित्ररथ एलइडी स्क्रीनसह योजनांची प्रसिद्धी करणे (चित्ररथ LED स्क्रीनसह जनजागृती वाहन, माहितीपत्रके, माहितीपट, कलापथक, जनसंवाद कार्यक्रम, क्रिएटिव्ह निर्मिती, फेब्रिकेशन डिझाईन, सजावट लेआऊट, जनरेटर, स्पीकर ,माईक व ऑडिओ-व्हिज्युअल सिस्टीमसह इत्यादी)	आषाढी वारी २०२६ संपूर्ण कालावधी	१,६३,७५,०००/-	२९,४७,५००	१,९३,२२,५००/-
३) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय	माहिती व जनसंपर्क महासंचालनालय:- कार्यालयीन, उपकरणावरील खर्च, सॉफ्टवेअर, तात्पुरता मनुष्यबळावरील खर्च, संशोधन खर्च व इतर खर्च		६५५,०००/-	--	--
		एकूण	१,७०,३०,०००/-	२९,४७,५००	१,९९,७७,५००/-

विविध माध्यमाद्वारे जाहिरात प्रसिध्दी प्रचलित नियम, कार्यपध्दती यानुसार पार पाडण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.

२. सदर देयकांचा खर्च मागणी क्रमांक सी-६, ८०, सर्वसाधारण, ००१, संचालन व प्रशासन (०१) महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, (०१) (०१) महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे कार्यालय स्थापन करणे तसेच फर्निचर व साधनसामुग्रीसह सुसज्जीकरण करणे (कार्यक्रम) लेखाशिर्ष क्रमांक (२२४५-१७६१) २६-जाहिरात व प्रसिध्दी या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ करिता मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात येईल.

३. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने यानुषंगाने संबंधित जाहिरात एजन्सी/आस्थापनांना कार्यादेश देण्याबाबत पुढील कार्यवाही करावी.

४. सन २०२६-२७ मध्ये प्रचार व प्रसिध्दी कार्यक्रम राबविण्यासाठी विभागीय आयुक्त, पुणे यांना कार्यक्रमाचे कार्यान्वयन तसेच संनियंत्रण करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने विषयांकित देयके प्रमाणित करून शासनाकडे सादर करण्यात यावीत.

५. प्रस्तुत प्रचार व प्रसिध्दी कार्यक्रम राबविण्यासाठी खर्च करतांना शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय / आदेश / परिपत्रके यानुसार तसेच, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र. ३०/२०१३/विनिमय, दि. १७.०४.२०१५ अन्वये निर्गमित नियम पुस्तिका १९७८ मधील तरतुदीचे / अटी व शर्तींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौसं क्र.३९५ अ / दि. १६.०७.२०२६ अन्वये प्राप्त मंजुरीस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७२३१५३९२०७१४१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

SURYAWANSHI
SAMPAT DASHARATH

Digitally signed by SURYAWANSHI SAMPAT DASHARATH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Department,
2.5.4.20=E2D0677DC3B9F523D6452EDD479C3B2EDC0887C9102B4130AE3EF3DD803B7322, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F8D5F07D73B60D73112565DB9BAEE680FFADE9B8758D5A695368E1D3656632DD, cn=SURYAWANSHI SAMPAT DASHARATH
Date: 2026.07.23 15:40:24 +05'30'

(संपत सूर्यवंशी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई,
२. मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृह निर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)) यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई
३. मा.उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ विभाग) यांचे सचिव,मंत्रालय,मुंबई
४. मा. मंत्री (मदत, पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री (मदत, पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. विधानमंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य,
७. मुख्य सचिव, यांचे सहसचिव मंत्रालय,मुंबई,
८. अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय,मुंबई,
९. प्रधान सचिव (नियोजन), मंत्रालय,मुंबई,
१०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
११. विभागीय आयुक्त (सर्व)

१२. संचालक (आपत्ती व्यवस्थापन) ,मंत्रालय , मुंबई
१३. वित्तिय सल्लागार व सहसचिव,मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
१४. संचालक, लेखा व कोषागारे ,मुंबई
१५. जिल्हाधिकारी, पुणे, सातारा, सोलापूर, मुंबई
१६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१७. महालेखापाल (लेखा परिक्षा) १/२,महाराष्ट्र,मुंबई/नागपूर,
१८. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
१९. कार्यासन अधिकारी मदत-३, (म-११) मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
२०. वित्त विभाग (कार्यासन व्यय-९/अर्थ-६),मंत्रालय,मुंबई
२१. निवड नस्ती (कार्यासन/ मदत-१/ म-३)